**स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सेफ्टीक टँक मधील मैला व्यवस्थापना बाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**नगर विकास विभाग**

**शासन परिपत्रक, क्रमांकः स्वमअ-२०१७/प्र.क्र.२६३/नवि-३४**

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

दिनांक: ३० डिसेंबर,२०१७

**पहा :** शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्रमांक स्वमअ २०१५/प्र.क्र.२३/नवि-३४, दिनांक १५ मे, २०१५

**परिपत्रक:**

केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियानाच्या धर्तीवर राज्यामध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियानाची अंमलबजावणी सुरु आहे. या अभियानांतर्गत शहरांमधील ज्या कुटुंबाकडे शौचालयाची सुविधा नाही अशा कुटुंबियांना शौचालयाची सुविधा (वैयक्तीक अथवा सामुदायीक) उपलब्ध करुन देवून शहरे "हागणदारी मुक्त" करणे, तसेच शहरातील घनकचरा व्यवस्थापन करुन शहर "स्वच्छ" करणे या दोन प्रमुख बाबींचा समावेश आहे.

२. स्वच्छ महाराष्ट्र अभियानाची अंमलबजावणी राज्यातील प्रत्येक शहरामध्ये सुरु आहे. या अभियानांतर्गत ज्या कुटुंबाकडे शौचालयाची सुविधा उपलब्ध नाही अशा कुटुंबांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करुन देवून **राज्याचा संपूर्ण नागरी भाग हा दिनांक १ ऑक्टोबर,२०१७ रोजी मा.राष्ट्रपती महोदयांच्या उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमामध्ये हागणदारी मुक्त झाल्याचे घोषित करण्यात आले आहे.**

३. राज्यातील बहुतांश शहरांमध्ये भूमीगत मलनिस:रणाची व्यवस्था व या सांडपाण्यावर प्रक्रिया केंद्रे (STP) नाहीत. त्यामुळे, या शहरांमध्ये बांधण्यात येणारी शौचालये सेफ्टीक टँकला जोडलेली असतात. सेफ्टीक टँकमधील मैला काही ठराविक कालावधीमध्ये de-sludging करणे आवश्यक आहे. हे de-sludging नागरी स्थानिक संस्थांकडील अथवा खाजगी कंत्राटदारांच्या de-sludging यंत्राव्दारे करण्यात येतो. परंतु, या प्रकारे de-sludging करण्यात आल्यानंतर त्या मैल्यावर शास्त्रोक्त प्रक्रीया करण्याची पध्दती सध्यातरी उपलब्ध नाही. त्यामुळे, de-sludging यंत्राव्दारे काढण्यात आलेला मैल्यावर योग्य प्रक्रीया होण्यासाठी सांडपाणी प्रक्रीया केंद्रात या मैल्यावर प्रक्रीया करणे आवश्यक आहे. तथापी, वर नमूद केल्यानुसार राज्यातील बहुतांश शहरांमध्ये सांडपाण्यावर प्रक्रिया करणारी केंद्रे (STP) नसल्याने ज्या शहरांमध्ये ही व्यवस्था उपलब्ध आहे अशा शहरांची व्यवस्था फक्त मैला व्यवस्थापनाच्या दृष्टिने इतर शहरांना उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. ही बाब विचारात घेवून या शासन परिपत्रका सोबतच्या ***जोडपत्र-१*** नमूद केल्यानुसार रकाना क्रमांक २ मधील शहरांमध्ये असलेली व्यवस्था रकाना क्रमांक ३ मध्ये नमूद शहरांच्या de-sludging केलल्या मैल्यावर प्रक्रीया करण्यासाठी उपलब्ध करून देण्यास शासन मान्यता देत आहे.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१२३०१५१११४८६२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Sudhakar
Dnyandeo Bobade

Digitally signed by Sudhakar Dnyandeo Bobade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bc1634ab95abe4652ec2433f0ccd505c20ea3e7ecad3bfcb55d49ad9dbd0fe5e, serialNumber=2e4705465b9bdfd5b38b2d36aae83659869796cb8cc2aefbc550989feec27db1, cn=Sudhakar Dnyandeo Bobade
Date: 2017.12.30 17:55:38 +05'30'

**(सुधाकर ज्ञा. बोबडे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन,मलबार हिल, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.राज्यमंत्री (नगर विकास), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
५. विभागीय आयुक्त, महसूल विभाग, (सर्व)
६. आयुक्त तथा संचालक, नगर परिषद संचालनालय, वरळी, मुंबई
७. आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
८. जिल्हाधिकारी (सर्व)
९. मुख्याधिकारी, नगरपरिषद/ नगरपंचायत (सर्व)
१०. राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान(नागरी) मुंबई
११. मा.प्रधान सचिव (नवि-२), यांचे स्वीय सहाय्यक
१२. निवड नस्ती (नवि-३४)

<u>*जोडपत्र-१*</u>

**शासन परिपत्रक, क्रमांकःस्वमअ-२०१७/प्र.क्र.२६३/नवि-३४ दिनांक ३० डिसेंबर, २०१७ चे जोडपत्र**

| अ.क्र. | STP ची सुविधा उपलब्ध असलेली नागरी स्थानिक स्वराज्य संस्था | सुविधा उपलब्ध करून द्यावयाची नागरी स्थानिक स्वराज्य संस्था |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | वसई-विरार | डहाणू, पालघर |
| २ | अंबरनाथ | माथेरान |
| ३ | पनवेल | अलिबाग, खोपोली, कर्जत, रोहा, पेण |
| ४ | पिंपरी-चिंचवड | तळेगाव, लोणावळा, आळंदी |
| ५ | कोल्हापूर | कागल, पन्हाळा, गडहिंग्लज, आष्टा, वडगाव |
| ६ | पंढरपूर | सांगोला, करमाळा, माळशिरस, अक्कलकोट |
| ७ | इचलकरंजी | कुरूंदवाड, जयसिंगपूर |
| ८ | कराड | विटा, इस्लामपूर, तासगाव |
| ९ | सोलापूर | दूधणी, मैंदर्गी |
| १० | नाशिक | सिन्नर, इगतपूरी, त्रंबक, सटाणा, मनमाड, येवला |
| ११ | शिरपूर | दोंडाईचा-वरवाडे, चोपडा, धूळे, नंदूरबार, अमळनेर, धरणगाव |
| १२ | शिर्डी | कोपरगाव, राहता, राहूरी, संगमनेर, श्रीरामपूर |
| १३ | नागपूर | मौंदा, रामटेक, महादूला, सावनेर, खापा, काटोल, पवणी, तूमसर, कळमेश्वर, उमरेड, देवळी, सिंदी, मोहपा |
| १४ | चंद्रपूर | बाळापूर, वरोरा, भद्रावती, राजूरी, मूल, गडहिंग्लज, गडचांदूर |
| १५ | नांदेड | हिंगोली, परळी, कळमनूरी, उमरी |
| १६ | औरंगाबाद | पैठण, वैजापूर, सिल्लोड, गेवराई, भोकरदान |
| १७ | अमरावती | दर्यापूर, अंजनगाव सूर्जी, चिखलदरा, अचलपूर, चांदूर रेल्वे,धामणगाव रेल्वे, शेंदूरजना घाट |
| १८ | वाशिम | उमरखेड |
| १९ | शेगाव | जळगाव जामोद, बुलढाणा, अकोला |